UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue

Issue I, Vol I 10th February 2018

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

184

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कथेचे बदलते स्वरूप आणि वास्तव | प्रा.डॉ. जगताप उज्वला | 138 |
| 14 | जागतिकीकरण आणि भाषा, साहित्य व संस्कृती | डॉ.लक्ष्मण गिते | 141 |
| 15 | "जागतिकीकरण आणि मराठी कथात्म साहित्य" | श्री. सुनिल रामराव काकडे, प्रा. डॉ. अनिरुध्द मोरे | 143 |
| 16 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | 147 |
| 17 | जागतिकीकरण आणि भारतीय भाषा | डॉ. राम रौनेकर | 153 |
| 18 | जागतिकीकरणामध्ये मराठी संस्कृतीचे संवर्धन आणि आदर्शस्थाने | प्रा.डॉ. रामनाथ गंगाधर वाढे | 156 |
| 19 | जागतिकीकरण आणि स्त्रीवादी साहित्य | प्रा.डॉ. रामलीला सुदामराव पवार | 160 |
| 20 | जागतिकीकरण आणि भाषा | स्हा. प्रा. वाडेकर छाया किसनराव | 164 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठवाड्यातील ग्रामीण कविता. | प्रा.भारत चिमाजी चव्हाण | 166 |
| 22 | जागतिकीकरण साहित्य आणि मराठी भाषा | डॉ.संदीप अ. बनसोडे | 168 |
| 23 | जागतिकीकरण आणि दलित साहित्यातील आत्मकथने | डॉ.समाधान इंगळे, प्रा.शरद लक्ष्मणराव सदाफुले | 171 |
| 24 | जागतिकीकरण व ग्रामीण संस्कृती | प्रा. महानंदा संदीपान बीडकर | 175 |
| 25 | जागतिकीकरणामध्ये सूफी आणि दत्त संप्रदाय तत्त्वविचार तुलनात्मक संशोधन | प्रा. टकले जी.पी. | 179 |




15 5

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol I, 10th Feb. 2018

# जागतिकीकरण आणि भारतीय भाषा

डॉ. राम रौनेकर
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना .

(17)

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात सतत परिवर्तन होत असते. यालाच आपण क्रांती म्हणतो. जीवन जगत असताना मानवाने जे महन्मंगल आहे, त्याचा स्वीकार केला आणि जे काळाच्या कसोटीवर उतरत नाही त्याचा त्याग केला. यातून जगात सतत बदल घडत गेले हे बदल प्रामुख्याने आर्थिक आणि सामाजिक अंगाने अधिक झाले. पाश्चात्यांनी आर्थिक अंगाचा अधिक विचार केला; तर पौर्वात्यांनी सामाजिक अंगाचा ! येथे हा त्या त्या भूमीचा तो संस्कार आहे, असे म्हटले तरी चालेल.

ज्ञानोबारायांनी म्हटले की, 'हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपणची जाहला ।।' ही विश्वव्यापी कल्पना जागतिकीकरणाच्या मुळाशी असणे अपेक्षित आहे. मानव जीवनाच्या कल्याणार्थ जीवनोपयोगी वस्तूंची जगभरात देवाण घेवाण करणे म्हणजे जागतिकीरण होय, अशी व्याख्या करणे शक्य आहे. आज पाश्चात्यांची भौतिक प्रगती आणि पौर्वात्यांची अध्यात्मिक प्रगती यांची सांगड घालून जगाचे कल्याण करणे शक्य आहे. ही विश्व कल्याणाची भूमिका घेऊनच सर्वांनी पुढे जावे लागणार आहे.

जगातील सर्व भाषांचा विचार केला असता अध्ययनांती ध्यानी येते की, भारतीय भाषा या सत्त्वगुणी आहेत. आशय आणि अभिव्यक्ती अशा दोन्हीही अंगाने त्या श्रीमंत आहेत. येथील साधू-संत, ऋषी-मुनींनी त्या विकसित केल्या आहेत. म्हणून मानवी जीवनात त्यांचे स्थान असाधारण आहेत.

पाश्चात्य राष्ट्रे जेव्हा टोळ्या टोळ्यांनी फिरत होती; तेव्हा भारतात नालंदा आणि तक्षशिलासारखी विद्यापीठे कार्यरत होती. हे भारतीय भाषांचे सामर्थ्य आहे, असे असले तरी आज या भारतीय भाषांवर परकीय भाषांचे मोठ्या प्रमाणावर आक्रमणे होत आहेत. जागतिकीकरणाच्या नावाखाली इतर भाषांचे गोडवे गावून भारतीय भाषांची गळचेपी सुरु झाली आहे. आज भारतातील अनेक बोली हळूहळू नष्ट होत चालल्या आहेत.

पाश्चात्यांची भौतिक प्रगती बघून भारतीयांचे डोळे दिपतात. त्यांचे सर्वच चांगले अशी धारणा बनते. त्यातून अंधानुकरण सुरु होते. जागतिक पातळीवर टिकावयाचे असेल ; तर असे करावे लागेल अशी आपली भूमिका बनत जाते. याचा सरळ सरळ अर्थ असा की, जागतिकीकरणाचा अर्थच मुळात आपणास कळाला नाही किंवा त्याचा विक्षिप्त अर्थ आपण लावला. ज्यामुळे आज सत्ता-संघर्ष, प्रांत संघर्ष, कुटुंब संघर्ष आदींचा जन्म झाला आहे. हे सर्व अज्ञानातून आले आहे.

भारतीय संस्कृतीने सर्व देश आणि त्या देशातील माणसे एकच आहेत, असा सिध्दांत मांडला. विश्वाची विविध देशात झालेली विभागणी ही व्यवस्थेसाठी आहे, विरोधासाठी नाही. हे विश्व एकाच ईश्वराने व्यापले आहे हे तत्त्वज्ञान येथील वेद आणि उपनिषदांनी सांगितले आहे. म्हणून भारतीय भाषा आणि तत्त्वज्ञान जगाला एकत्वाची ओळख करुन देते. जगात कुठलाही भेद नाही ते अभेद आहे. नानात्वात एकत्व असते. जसे - 'धागा एक मात्र कपडे अनेक' तसे जगाचे आहे. ही शिकवण भारतीयांची आहे. या तत्त्वाला छेद देण्याचे काम जागतिकीकरणाच्या नावाखाली सुरु आहे. हे कटू असले ; तरी सत्य आहे. ते कोणासही नाकारता येणार नाही. उत्तम कांबळे म्हणतात, ''जागतिकीकरणातलं सांस्कृतिक विश्व कमालीचं नाजूक, कमालीचं संवेदनशील बनतं आहे''[२]

जागतिकीकरणात जगाने भेदाला प्राधान्य दिले. तुकड्यांची अपेक्षा ठेवली. स्वतःच्या राष्ट्राबद्दल कडवा अभिमान बाळगला आणि इतरांच्या बाबतीत द्वैती वृत्ती ठेवली आणि हेच जगाच्या दुःखाचे कारण आहे. भारतीयांनी भेद नाकारला तुकोबाराय म्हणतात, 'भेदाभेद भ्रम अमंगळ'.

भारतीय भाषा आणि संस्कृती यांचा परस्परपूरक संबंध आहे. त्या एकमेकांवर अवलंबून आहेत. त्यांनी येथील तत्त्वज्ञान सांगितले की, जीव आत्मोपासक बनला पाहिजे. त्याशिवाय त्याच्याठायी दयावृत्ती नाही. ती जोपर्यंत येत नाही, तोपर्यंत दुःख जात नाही. दयावृत्ती स्वीकारणे म्हणजे आनंदी होणे. ही निर्माण करण्याचे कार्य येथील संस्कृतीने आणि भाषांनी केले आहे. इतिहास याची अनेकदा साक्ष देतो आहे. अशोक केळकर म्हणतात,''सकस वैचारिक गद्य हे सकस विचारांचे फलित



१२६.

ISSN: 2319 9318

**Publisher:**
Smt. Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed- 431126
Cell- 9850203295

© **Dr.S.R. Nimbore**

**Organising Committee:**

Dr. S.G. Gopane (Vice Principal)
Prof. D.P.Mundhe
Dr. B. S. Waghmare
Dr. B.N. Mutkule
Dr. S.M. Wandhare
Prof. N.N. Nanwate
Prof. M.K. Shirsath
Prof. R.S. Satbhai
Prof. R.E. Bharudkar
Prof. M.C. Talware
Prof. J.M. Pathan
Dr. R.T. Sontakke
Dr. A.B. Shinde
Prof. S. A. Mutkule
Prof.Smt.S.M.Khude
Dr. S.A. Wangujare

**Printer:**
Shivam Digital, Ashti Dist.Beed
Ashish Press, Ashti Dist.Beed

**Type Setting:**
Shri. T.K. Redekar
Shri. S.S. Nikalje

**Edition:**
First Edition - February 2018



Scanned by CamScanner